## वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ एप्रिल २०१७.

## अधिसूचना

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५.**

क्र. व्यकर.२०१७/प्र.क्र.२०क/कराधान-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री आली आहे की, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) च्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही;

म्हणून, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (२) आणि कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करुन तसेच या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये, खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

१. (१) या नियमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) नियम, २०१७ असे संबोधण्यात येईल.

(२) (एक) नियम २ आणि नियम ४ दिनांक १ मे २०१७ पासून अंमलात येतील;

(दोन) नियम ३, ही अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास अंमलात येईल.

२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ (यापुढे "मुख्य नियम" असे संबोधण्यात येईल) च्या प्रकरण तीन च्या शिर्षकाऐवजी खालील शिर्षक दाखल करण्यात येत आहे, म्हणजे :—

"**विवरणे, नोटीस, कर आणि व्याजाचा भरणा.**"

३. मुख्य नियमांच्या नियम ११अ मध्ये, "त्रैमासिक च्या शेवटच्या दिवशी" या शब्दांऐवजी "महिन्याच्या शेवटच्या दिवशी" हे शब्द दाखल करण्यात येत आहेत.

४. मुख्य नियमांच्या नियम ११क नंतर खालील नियम दाखल करण्यात येत आहे, म्हणजे :—

"**११क-१. व्याजाचा दर.**—कलम ९ च्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनार्थ व्याजाचा दर खालील तक्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल :—

**तक्ता**

| अनु. क्र. | व्याजासाठी पात्र कालावधी | व्याजाचा दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | एका महिन्यापर्यंत विलंब | अशा न दिलेल्या कराच्या रकमेवर त्या महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी सव्वा टक्का. |
| २. | तीन महिन्यांपर्यंत विलंब | (एक) **पहिल्या महिन्यापर्यंतच्या विलंबासाठी**—अशा न दिलेल्या कराच्या रकमेवर त्या महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी सव्वा टक्का,<br>(दोन) **एका महिन्याच्या पुढे तीन महिन्यांपर्यंतच्या विलंबासाठी**—अशा न दिलेल्या कराच्या रकमेवर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी दीड टक्का. |

| | | |
|---|---|---|
| ३. | तीन महिन्यांपेक्षा जास्त विलंब | (एक) **पहिल्या महिन्याच्या विलंबासाठी**—अशा न दिलेल्या कराच्या रकमेवर त्या महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी सव्वा टक्का,<br>(दोन) **एका महिन्याच्या पुढे तीन महिन्यांपर्यंतच्या विलंबासाठी**—अशा न दिलेल्या कराच्या रकमेवर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी दीड टक्का,<br>(तीन) **तीन महिन्यांपेक्षा जास्त विलंबासाठी**—अशा न दिलेल्या कराच्या रकमेवर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी दोन टक्के. |

”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. द. भगत,**

शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 19th April 2017.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

No.PFT.2017/C.R.20C/Taxation-3.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section (*3*) of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 9 and sub-sections (*1*) and (*2*) read with the proviso to sub-section (*3*) of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, namely :—

**1.** (1) These rules may be called the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments (Amendment) Rules, 2017.

(2) (*i*) Rule 2 and rule 4 shall come into force with effect from the 1st May 2017;

(*ii*) Rule 3 shall come into force on the date of publication of this notification in the *Official Gazette.*

**2.** For the heading of CHAPTER III of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 (hereinafter referred to as "the principal Rules"), the following heading shall be substituted, namely : —

***"RETURNS, NOTICES, PAYMENT OF TAX AND INTEREST".***

**3.** In rule 11A of the principal Rules, for the words "the last date of the quarter" the words "the last date of the month" shall be substituted.

**4.** After rule 11C of the principal Rules, the following rule shall be inserted, namely : —

"**11C-1. The rate of interest.** — The rates of interest for the purposes of sub-section (*2*) of section 9 shall be as specified in the table below:—

**TABLE**

| **Sr. No.** | **Period, liable for interest** | **Rate of interest** |
|---|---|---|
| **(1)** | **(2)** | **(3)** |
| 1. | Delay upto one month | One and a quarter per cent. of the amount of such unpaid tax, for the month or for part thereof. |
| 2. | Delay upto three months | (*i*) *Delay upto one month*— One and a quarter per cent. of the amount of such unpaid tax, for the month or for part thereof,<br>(*ii*) *Delay beyond one month upto three months* — One and half per cent. of the amount of such unpaid tax, for each month or for part thereof. |

| | | |
|---|---|---|
| 3. | Delay more than three months | (i) *Delay upto one month* — One and a quarter per cent. of the amount of such unpaid tax, for the month or for part thereof,<br>(ii) *Delay beyond one month upto three months* — One and half per cent. of the amount of such unpaid tax, for each month or for part thereof,<br>(iii) *Delay more than three months* — Two per cent. of the amount of such unpaid tax, for each month or for part thereof. |

".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. D. BHAGAT,
Deputy Secretary to Government.